Welcome

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

# र. भ. अट्टल कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय

गेवराई, जि. बीड

## राष्ट्रीय सेवा योजना

Not Me But You

# Health Camps








एड्स जनजागृती

मुफ्त तपासणी - महाआरोग्य शिबिर



तंबाखू मुक्त अभियान दिन






Covid Vaccination 6 time camp

# Yoga Camp

## योगा – प्राणायाम उपक्रम





















# Covid-19 organized by 6 Vaccination camps

दिव्य **लोकप्रभा**

Fri 29-10-2021
Page No. 5

## गेवराईच्या अट्टल महाविद्यालयात लसीकरण शिबिरात १८५ अधिक जणांनी घेतला लाभ



सुभाष मुळे । गेवराई

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, र.भ.अट्टल महाविद्यालयात मिशन युवा स्वास्थ्य अंतर्गत कोविड लसीकरण शिबिर संपन्न झाले. प्राचार्य डॉ.रजनी शिखरे यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन झाले. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. प्रशांत पांगरीकर, मेजर डॉ. विजय सांगळे, प्रबंधक बाप्पासाहेब पिंपळे, कार्यालयीन अधीक्षक भागवत गवंडी, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी समाधान इंगळे, प्रा. रेवणनाथ काळे, डॉ. सुदर्शना बढे, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे केंद्र संयोजक डॉ. अमोल शिरसाट, सहाय्यक अधिसेविका रेखा जोशी, डॉ. संगीता तिडके, डॉ. राजेंद्र आंधळे, आरोग्य सेविका रंजना वसावे, अलकनंदा गर्जे, शितल बेंद्रे, शिबिरासाठी सहाय्यक म्हणून काम बघणारे जिल्हा परिषद शिक्षक सिकंदर शेख, श्यामलाल नवले, प्रशांत मस्के, नितीन म्हेत्रे यांची उपस्थिती होती.या महाविद्यालयाने आवाहन केल्याप्रमाणे शेकडो विद्यार्थी तसेच त्यांचे पालक कोविड लसीकरण शिबिरात सहभागी झाले. १८५ हून अधिक जणांनी कोविड लसीकरणाचा लाभ घेतला. कोविशिल्ड आणि कोवॅक्सीनचे दोन्ही डोस आरोग्य कर्मचाऱ्यांनी उपलब्ध करून दिले होते. सर्व प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी, राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक, राष्ट्रीय छात्र सेना विभागातील विद्यार्थ्यांनी शिबिराच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. या शिबिरात सहभागी न होऊ शकलेल्या विद्यार्थ्यांसाठी लसीकरणाची पुढील संधी शुक्रवारी, २९ ऑक्टोबर रोजी दिली जाणार आहे. राहिलेल्या सर्व विद्यार्थ्यांनी व पालकांनी पुढील शिबिरात सहभागी होण्याचे आवाहन महाविद्यालय प्रशासनाने केले आहे.







**लोकमत**

## शिबिरातून केले शंभर टक्के लसीकरणाचे उद्दिष्ट पूर्ण



गेवराईतील र.भ. अट्टल महाविद्यालयात १०० टक्के कोविड लसीकरण पूर्ण करण्यासाठी तिसरे शिबीर घेण्यात आले.

## अट्टल महाविद्यालयात लसीकरण पूर्ण

लोकमत न्यूज नेटवर्क

**गेवराई :** र. भ. अट्टल महाविद्यालय येथे कोविड प्रतिबंधक लसीकरणासाठी तिसरे शिबिर घेण्यात आले. महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार महाविद्यालयीन स्तरावर १०० टक्के कोविड लसीकरण करण्याच्या मोहिमेत महाविद्यालयात हे शिबिर घेण्यात आले. महाविद्यालयातील १८ वर्षे वयावरील संपूर्ण विद्यार्थ्यांचे तसेच प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांचे लसीकरण करण्यास महाविद्यालय यशस्वी झाले आहे.

उपजिल्हा रुग्णालयातील आरोग्य कर्मचारी डॉ. मिसाळ, डॉ.आंधळे, वसावे, गर्जे आणि सहकारी शिक्षकांनी या शिबिरात सहभाग नोंदवला. महाविद्यालयातील १८ वर्षे वयावरील संपूर्ण विद्यार्थ्यांचे तसेच प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे लसीकरण करण्यास महाविद्यालय यशस्वी झाले आहे. नियमित तासिका आणि परीक्षांच्या पार्श्वभूमीवर हे लसीकरण विद्यार्थ्यांसाठी बंधनकारक होते. प्राचार्य डॉ. रजनी शिखरे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय छात्र सेना आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागांच्या माध्यमातून हे शिबिर राबविण्यात आले. या शिबिरासाठी उपप्राचार्य डॉ. मेजर विजय सांगळे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. समाधान इंगळे, प्रशासकीय कर्मचारी किसन सागडे यांनी परिश्रम घेतले. डॉ. सुदर्शना बढे, प्रा. रेवणनाथ काळे, राष्ट्रीय छात्र सेना व राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवकांनी पुढाकार घेऊन लसीकरण न झालेल्या विद्यार्थ्यांना एकत्रित करून शिबिर यशस्वी केले.

Hello Beed
Page No. 4 Dec 18, 2021
Powered by: erelego.com

# Pulls - Polio Vaccination

## राष्ट्रीय पल्स पोलिओ टीकाकरण मुहीम











Special Camp
Reoki

# 7 Days Special Camp Invitation – Adopted Village Reoki –2021-22






महिलाओ के आरोग्य
हेतू डॉक्टर से संवाद

PRINCIPAL
R.B.Attal College
Georai Dist.Beed